—: प्रेसनोट :— दिनांक : ३१/०३/२०२२

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | २२/२०२२ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ताा. | १. रितेश मनोहरलाल जायस्वाल, धंदा—नोकरी (कनिष्ठ अभियंता)<br>२. श्रीमती प्रज्ञा व्ही. सावंत, धंदा—नोकरी (जलमापक पर्यवेक्षक)<br>३. श्री. पटेल (पुर्ण नांव माहित नाही), धंदा—नोकरी (मीटर रिडींग निरीक्षक)<br>४. श्री. शरद श्रीधर कदम, धंदा—नोकरी (शिपाई)<br>कार्यालय—सहाय्यक अभियंता (जलकामे), पी/उत्तर विभाग, मनपा कार्यालय, मालाड (प),मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ९,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. २,०००/— |
| हस्तगत केलेली रक्कम | रु. २,०००/— |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी यांनी त्यांचे परिसरातील ओळखीचे इसमाचे घरासाठी नवीन नळ कनेक्शनसाठी लागणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करुन सहाय्यक आयुक्त कार्यालय, पी/उत्तर विभाग, मनपा कार्यालय, मालाड (प), मुंबई येथे सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केली होती.<br><br>सदर नवीन नळ कनेक्शन देण्याकरीता असलेल्या फॉर्मवर सही करण्यासाठी फिर्यादी यांचेकडे यातील आलोसे क्र. १ यांनी रु. ५०००/—, आलोसे क्र. २ यांनी रु. १०००/—, आलोसे क्र. ३ यांनी रु. १०००/— व आलोसे क्र. ४ यांनी रु. २०००/— अशी एकुण रु. ९०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांना लोंकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नमुद आरोपी लोकसेवकाविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br><br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ३०/०३/२०२२ रोजी पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान यातील आलोसे क्र. १ ते ४ यांनी पंचासमक्ष वरील नमुद प्रमाणे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. ४ यांनी फिर्यादी यांचेकडुन रु. २०००/— लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांस रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन वर नमुद आलोसे क्र. १ ते ४ यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net

Scanned with CamScann